# प्रेस नोट

दि.०३/०७/२०१८

## डॉ.संजय नेमीचंद खंडागळे, जिल्हा कारागृह वैद्यकीय अधिकारी वर्ग–२ अहमदनगर यांचे विरुध्द भ्रष्टाचाराचा गुन्हा दाखल

प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की,आरोपी नामे डॉ.संजय नेमीचंद खंडागळे यांनी तालुका आरोग्य अधिकारी, म्हणुन पंचायत समिती, अकोले जि.अहमदनगर येथे नेमणुकीस असतांना, "आशा प्रशिक्षण" व "पीआरआय प्रशिक्षण" सत्राचे खर्चामध्ये स्वत:च्या अधिकारात तालुका आरोग्य अधिकारी पदाचा दुरूपयोग करून सदर प्रशिक्षण कालावधी सन २००८ ते २०११ मध्ये वेगवेगळया प्रशिक्षण सत्राच्या प्रत्येक बॅचमध्ये स्वत: पूर्ण दिवस प्रशिक्षक असल्याचे कागदोपत्री दाखविले आहे. त्यावेळी ते अनेक ठिकाणी इतर शासकीय कामांसाठी उदा. क्षेत्रीय भेटी, वेगवेगळया स्तरावरील बैठका, कार्यशाळा, पीआरआय प्रशिक्षण येथे उपस्थित असल्याचे चौकशीत स्पष्टपणे दिसुन आले आहे. म्हणजेच एकाच वेळी दोन व त्यापेक्षा जास्त ठिकाणी उपस्थिती दाखवुन दोन्ही ठिकाणचे मानधन दैनिक भत्ता, प्रवास भाडे इ.चा प्रशिक्षण सत्रामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय,अहमदनगर यांचेकडुन प्राप्त झालेल्या एकुण ११,७१,१३८/– रुपयांचे निधीपैकी ४,२८०/– रुपये व सन २००८ ते २००९ या कालावधीत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत घेतलेल्या पी.आर.आय.सदस्यांचे प्रशिक्षण सत्रामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी,अहमदनगर यांचेकडुन प्राप्त झालेल्या एकुण १,८५,४५०/– रुपयांचे निधीपैकी ६,४०६/– रुपये असे एकुण खर्चामध्ये रुपये १०६८६/–शासकीय निधीचा अपहार केलेला असल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यांचे विरुध्द अकोले पोस्टे गुरनं २१६/२०१८ ला.प्र.का.क १३(१)(ड)सह १३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक डॉ.पंजाबराव उगले,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परिक्षेत्र नाशिक यांच्या मार्गदर्शनाखाली लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर युनिटने केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर कार्यालयामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की,त्यांना त्यांचे शासकीय काम करुन देण्यासाठी कोणी शासकीय लोकसेवक कामाच्या बदल्यात लाचेची मागणी करत असेल तसेच शासकीय लोकसेवकाने त्यांचे ज्ञात उत्पन्नाचे स्त्रोतापेक्षा जास्त मालमत्ता संपादित केली असेल तर त्यांचे बेहिशेबी मालमत्तेच्या माहिती बाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय,अहमदनगर येथे संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| कार्यालयाचा पत्ता | पोलीस उप अधीक्षक कार्यालय,जिल्हा मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,टि.व्ही.सेंटर समोर सावेडी अहमदनगर |
| फोन नंबर | ०२४१–२४२३६७७ |
| टोल फ्री नंबर | १०६४ |

(किशोर चौधरी)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर